# फायर सेफ्टीविषयी विक्रोळीत परिसंवाद

**घाटकोपर (बातमीदार) :** मुंबईत आगीच्या घटना घडण्याचे प्रकार वाढले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे बार, इमारती, रेस्तराँ यांनी फायर सेफ्टीविषयी योग्य दक्षता घेतली नाही. यामुळेच फायर सेफ्टीविषयी वाढत असलेली काळजी लक्षात घेऊन, गोदरेजने विक्रोळी पूर्व येथे फायर सेफ्टीविषयी चर्चा करण्यासाठी परिसंवादाचे आयोजन केले होते. या वेळी मेहेरनोश पिठावाला, के. शामी, मेजर जनरल सोली पावरी, बुरझिन सरभनवाला, विनायक साने, मुंबई अग्निशमन दलाचे एस. बी. खरबडे उपस्थित होते. आगीपासून सुरक्षित इमारत कशी निर्माण करावी, याविषयी माहिती देणे, हे या परिसंवादाचे उद्दिष्ट होते.